...ERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK



# जि.प. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा बोजवारा

## वीजबिल थकीत, शुद्ध पिण्याच्या पाण्याची वानवा

*** डिजिटल संच व शैक्षणिक साहित्याचा अभाव * एक-दोन शिक्षकांवर शाळांचा भार**

**आमा प्रतिनिधी/८ ऑक्टोबर**

**अंजनगाव बारी :** एकीकडे गुणवत्तापूर्ण व डिजिटल शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असताना, अंजनगाव बारी परिसरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मात्र मूलभूत सुविधांचीच वानवा असल्याचे चित्र आहे. काही शाळांचे वीजबिल थकीत असून, पंखे, डिजिटल संच, टीव्ही तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचा अभाव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना गैरसोयीच्या वातावरणात शिक्षण घ्यावे लागत आहे.

परिसरातील काही शाळा एक-दोन शिक्षकांच्या भरवशावर सुरू असल्याने अध्यापनाचा अतिरिक्त भार शिक्षकांवर पडत आहे. काही ठिकाणी टिनाच्या शेडमध्ये चिमुकल्यांना शिक्षण घ्यावे लागत असून, शाळांच्या भौतिक सुविधांचा प्रश्न गंभीर बनला आहे.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळणे ही प्राथमिक गरज असतानाही परिसरातील बऱ्याच शाळांमध्ये शुद्ध पाण्याची समस्या असल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी योग्य पाणी फिल्टरची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी व आवश्यक फिल्टरची व्यवस्था तातडीने करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.

ग्रामपंचायत स्तरावर शाळांसाठी उपलब्ध होणाऱ्या १० टक्के निधीतून काही सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी परिसरातील सर्व शाळांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी

हा निधी अपुरा पडत असल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

त्यातच गेल्या दोन पंचवार्षिकांपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर प्रशासकीय व्यवस्था असल्याने शाळांच्या विकासासाठी आवश्यक निधी, नियोजन आणि नियमित पाठपुराव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीचा मर्यादित निधी आणि जिल्हा परिषद-पंचायत समिती स्तरावरील प्रशासकीय कारभार असताना शाळांना आवश्यक निधी मिळणार कसा? असा सवाल पालक व ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायतीचे माजी प्रशासक सरपंच तसेच सध्या ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार पाहणारे विस्तार अधिकारी यांनी गावातील जिल्हा परिषद शाळांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. मासिक बैठका व ग्रामसभांमध्ये वीजबिल, शुद्ध पिण्याचे पाणी, पंखे, डिजिटल संच, टीव्ही, शैक्षणिक साहित्य, शिक्षकांची कमतरता आणि शाळांच्या भौतिक सुविधांचा प्रश्न प्राधान्याने मांडून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा. केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष पाहणी करून निधी उपलब्ध करून देत समस्या मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

विद्यार्थ्यांना सुरक्षित शाळा, शुद्ध पाणी आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळणे ही प्राथमिक गरज आहे. त्यामुळे 'गुणवत्तापूर्ण शिक्षणा'च्या घोषणांपेक्षा प्रत्यक्ष शाळांमध्ये सुविधा पोहोचविण्यास प्रशासनाने प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

---

*समाजकार्य महाविद्यालयात परिसंवाद*

# 'जे विकेल ते पिकवा' या संकल्पनेतून समृद्ध शेतीचा संदेश : प्रा.चंचल धंदर

**आमा प्रतिनिधी/८ ऑक्टोबर**

**अमरावती :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित समाजकार्य महाविद्यालय, अमरावती येथे शेतकरी आत्महत्या या गंभीर सामाजिक प्रश्नावर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व संवेदनशीलता निर्माण करण्याच्या उद्देशाने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र देशमुख होते. त्यांनी शेतकरी आत्महत्येमागील सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व मानसिक घटकांचा ऊहापोह करून समुपदेशन व सामाजिक हस्तक्षेपाची गरज स्पष्ट केली. प्रमुख मार्गदर्शक प्रा. चंचल धंदर यांनी नव्या युगाचा प्रत्यक्ष मार्ग : 'जे विकेल ते पिकवा' आणि शेतीत समृद्धी आणा! या संकल्पनेतून बाजारपेठेची गरज ओळखून उत्पादनाचे नियोजन, पीक पद्धतीतील बदल आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत शेती करण्याचे आवाहन केले. तसेच विदर्भातील शेतकरी आत्महत्यांची कारणे व त्यावरील उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. क्षेत्रकार्य मार्गदर्शक डॉ. राजकुमार दासरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शेतकरी आत्महत्येची कारणे, शेतकरी कुटुंबांच्या समस्या, शासकीय योजना, समाजकार्यकर्त्यांची भूमिका, समुपदेशन व आत्महत्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर सादरीकरण केले. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन, समाज, कृषी क्षेत्र आणि समाजकार्य क्षेत्राच्या समन्वित प्रयत्नांसोबतच बाजाराभिमुख व शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे आवश्यक असल्याचा संदेश परिसंवादातून देण्यात आला.

सूत्रसंचालन कु. प्रणाली निकम यांनी केले, तर आभार प्रदर्शन ऋषिकेश इंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आदित्य जिरापुरे, स्नेहल शिंदे, प्रतीक नागपुरे, आचल जामोदकर, जानराव खंडारे, नेहा जावरकर, ओम कडू, अनुष्का गुर्जर, संदेश इंगळे, पूजा शाखा पवार, अभिजित पाटील व युवराज घोरपडे यांनी परिश्रम घेतले.

---

# ऑपरेशन कवच अंतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

## पीएम श्री न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे आयोजन

**आमा प्रतिनिधी । ८ ऑक्टोबर**

**शेंदुरजनाघाट -** पीएम श्री न.प. उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे ... सोशल मीडिया व इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत मार्गदर्शन केले. अनोळखी लिंक, संदेश व फोनला प्रतिसाद देताना घ्यावयाची काळजी तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचावाच्या उपाययोजनाही समजावुन सांगण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन पंकज चाफले तर आभार नंदकिशोर नागपुरे ...

---

*मराठी भाषेच्या अभिजाततेचा जागर*

# बांधिलकीचे तिसरे ऑनलाइन कविसंमेलन उत्साहात

**आमा प्रतिनिधी/८ ऑक्टोबर**

**अमरावती :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या गौरवपूर्ण पार्श्वभूमीवर बांधिलकी प्रतिष्ठान तसेच बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने आयोजित '३ रे बांधिलकी ऑनलाइन कविसंमेलन २०२६' नुकतेच गुगल मीटच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या ऑनलाइन कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. पुष्पराज गावंडे (युवा कादंबरीकार तथा सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक, अकोला) होते. देवा झिंझाड (सुप्रसिद्ध साहित्यिक तथा प्रकाशक, पेन प्रकाशन, पुणे) यांच्या हस्ते कविसंमेलनाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. रेखा जगनाळे (सुप्रसिद्ध साहित्यिक, ...

भाषाभिमानाचा संदेश देणाऱ्या ऑनलाइन पणती प्रज्वलनाने झाली. मराठी भाषेची समृद्ध परंपरा, तिचे सांस्कृतिक वैभव आणि बोलीभाषांचे महत्त्व यावर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हितेश गोमासे यांनी प्रभावीपणे केले. ... ओळख असल्याचे सांगत मायबोलीच्या संवर्धनासाठी प्रत्येक मराठी माणसाने योगदान देण्याचे आवाहन केले. स्वागतम् गीत रोशनी कडू यांनी सादर केले, तर आभार राहुल गवस यांनी मानले.

कविसंमेलनात डॉ. राणी चौधरी, योगिता निपाणे, रविन दांडगे, ... कोल्हटकर, ॲड. स्मिता बूल, अश्विनी गहाणकरी, प्रिया सफळे, सुप्रसिद्ध गझलकार विजय वासाडे 'विवा', सुचिता टेमघरे, गजानन डेहनकर, श्रीमती सुलोचना लडवे, शालिनी कावरे, दीपमाला अहिरे, शारदा बरडे आणि उज्वला राहणे आदी निमंत्रित कवींनी आपल्या विविधांगी कवितांचे सादरीकरण करून रसिकांची दाद मिळवली. मराठी भाषेवरील प्रेम, बोलीभाषांचा गोडवा, सामाजिक जाणिवा, निसर्ग, नातेसंबंध आणि मानवी संवेदनांनी नटलेल्या कवितांनी ऑनलाइन कविसंमेलनाला साहित्यिक उंची प्राप्त करून दिली.

मराठी भाषेचा गौरव, मायबोलीचे संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत साहित्याची गोडी पोहोचविण्याचा बांधिलकी प्रतिष्ठानचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

---

**महिला शिक्षिका आवश्यक**

इयत्ता ३ री (ICSE Pattern) च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास घेण्यासाठी घरी १ तासा साठी अनुभवी व हुशार महिला शिक्षिका आवश्यक आहे विषय, मराठी, इंग्रजी, गणित विज्ञान

ठिकाण - अमरावती राठी नगर, वेळ - दुपारी ३ नंतर

संपर्क - 8149699287

**Change of Name**

(OLD NAME)
RIYAZ ALI GAZANFAR ALI
(NEW NAME)
MIR RIYAZ ALI MIR GAZANFAR ALI

- Address -
OPPOSITE JAMA MASJID, MOMIN PURA, MURTIJAPUR
DIST AKOLA - 444001, MAHARASHTRA

**टी.सी.हरविली**

मेरा नाम मानसी विनोदकुमार नानवाणी, मेरी १२ वी की टी.सी. राजकमल चौक के दरम्यान तारीख ०४/१०/२०२६ को गुम हो गई है. कीसी को मिले तो निचे दिए गये नंबर पर संपर्क करे.

मोबा- 9404545815
8668512416

**जाहीर नोटीस**

विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

पोलिस स्टेशनचे सहायक ठाणेदार मनोरथ राठोड व त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांना सायबर हल्ले, ऑनलाईन फसवणुक, सायबर धोके,

अधिकारी माधव तिडके यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात 'पणती जपून ठेवा, अंधार फार झाला' या भावनेतून मराठी मायबोलीच्या संवर्धनाचा आणि

अमरावती यांना केले. त्यांना भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीची, अस्मितेची आणि भावविश्वाची

रसिका पनके, सुनीता तायडे, स्वाती सेलोकर, घनश्याम सावकर, रोशनी कडू, प्रणाली चव्हाटे, श्रद्धा

# आयईएसगर्ल्स अँड बॉईज विद्यालयाला मानाचा मुकुट

**आमा प्रतिनिधी/८ऑक्टोबर**

**परतवाडा :** शैक्षणिक क्षेत्रात सदोदित विद्यार्थी हितार्थ अग्रेसर असणाऱ्या आयडियल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आयईएस गर्ल्स अँड बॉईज विद्यालयाच्या प्राचार्या विद्याताई मु-हेकर यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल मुंबई येथे झालेल्या सोहळ्यात त्यांना 'लाईफ टाईम अच्युवमेंट' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

इ एस एफ एज्युकेशन, स्टार्ट ऑफ एज्युकेशन, एआय टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन, त्याचप्रमाणे वृत्तपत्र क्षेत्रात जगभर नावाजलेल्या निर्भीड निष्पक्ष असलेल्या टाइम्स ऑफ इंडिया या ग्रुपने प्राचार्य विद्याताई मु-हेकर यांना हा पुरस्कार संबधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी वितरित केला.

एन इ एस सी ओ एक्जीबिशन सेंटर मुंबई येथे पार पडलेल्या भव्य दिव्य अशा सोहळ्यात देशभरातील नामांकित व्यक्ती आणि पुरस्कर्ते उपस्थित होते. ज्यामध्ये टाइम्स ऑफ इंडिया ग्रुपचे चेअरमन, तसेच संनबीस एज्युकेशन इन्स्टिटयूट वाराणसीच्या डायरेक्टर अमृता बर्मन, पोद्दार इंटरनॅशनल लाईफचे चेअरमन राधव पोद्दार, जेम्स एज्युकेशन इंडियाचे सीईओ फ्रान्सिस जोसेफ सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

अशातच परतवाडा शहरात आयईएस गर्ल्स अँड बॉईज विद्यालयाच्या माध्यमातून अचलपूर तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी केलेल्या विद्याताई मु-हेकर यांना या कार्यक्रमात गौरवित करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या प्रांगणात सर्व शिक्षक, विद्यार्थी, तसेच माजी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांनी मु-हेकर मॅडम यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष संजय भाऊ पांगारकर, उपाध्यक्ष मुकेश पांगारकर, सचिव रश्मीताई पांगारकर, सदस्य भालचंद्र मु-हेकर सह सर्व पदाधिकाऱ्यांनी सन्मान मूर्ती विद्याताई मु-हेकर यांचे अभिनंदन केले

# सुधाकर मारुडकर यांचे निधन

**आमा प्रतिनिधी/८ ऑक्टोबर**

**अमरावती :** मूळ अमरावती येथील तसेच सध्या पिंपरी-चिंचवड परिसरातील पिंपळे सौदागर येथील रहिवासी सुधाकर बकाराम मारुडकर (वय ८४) यांचे बुधवारी (दि. ७) रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. ते अमरावती येथील बीएसएनएलमधून सिनीअर टेलीग्राम ऑफीसर या पदावरून निवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी आशा, मुलगा आशुतोष, मुलगी शीतल तसेच जावई आणि नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# तारखेडा अमरावती येथे
# श्रीमदभागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह उत्साहात

**आमा प्रतिनिधी८ ऑक्टोबर**

**अमरावती :** तारखेडा येथील शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या सुप्रसिद्ध श्री हरिचंद्र पाटील यांनी स्थापन केलेल्या गणपती मंदिर परिसरा मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय भव्य श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ समाहाची ५ आक्टोंबर २०२६ रोजी अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात सांगता झाली. या सोहळ्याच्या अंतिम दिवशी

## महाप्रसादाने सांगता

आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. २८ सप्टेंबर रोजी कलश स्थापनेने या भागवत समाहाचा प्रारंभ झाला होता. समाहा दरम्यान प्रसिद्ध कथाकार ह.भ.प.सौ लताताई वानखडे यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद भागवतातील विविध प्रसंगांचे निरूपण केले. यामध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पूजा, रुक्मिणी स्वयंवर आणि सुदामा मिलन यांसारखे प्रसंग विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. ह.भ.प सौ लताताई वानखडे यांच्या सुमधुर भजनांवर भाविक मंत्रमुग्ध होऊन थिरकले.

समाहाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ७ वाजता विधिपूर्वक हवन, पूजा आणि पूर्णाहुती करण्यात आली. कथा सांगताना ताईंनी भाविकांना मानवी जीवन यशस्वी करण्यासाठी भक्ती, सदाचार आणि आई-वडिलांची सेवा करणे किती महत्त्वाचे आहे हा मोलाचा संदेश दिला.

दुपारी १२ वाजता ह.भ.प ओम महाराज पाथरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील तसेच आजूबाजूच्या गावांतील अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. विठ्ठल महाराज चौधरी, अ.भा.वारकरी संघाच्या जिल्हा अध्यक्षा लिनाताई चौधरी, सामाजीक कार्यकर्ते प्रताप देशमुख, व समस्त देशमुख परीवार तरुण कार्यकर्त्यांनी आणि स्वयंसेवकानी अहोरात्र परिश्रम घेतले.

दैनिक आपली मातृभूमि हे पत्र प्रकाशक, मुद्रक अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांनी प्रणय कम्युनिकेशन, मच्छीसाथ, सातखिराडी रोड, अमरावती येथे मुद्रित करून दैनिक आपली मातृभूमि कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिध्द केले.
संपादक : अनिल जुगलकिशोर अग्रवाल,
आरएनआय क्र. : MAHMAR/2010/34861
कार्यालय (फोन-०७२१) २५५०८५०, २६६६६००
Email aplimatrubhumi@gmail.com वर्ष-१७, अंक-२४

विक्रेता (Salesman)
आवश्यक
अमरावती साठी
एजन्सी प्रोडक्ट्स,
ठिकान - गुलशन टावर
वेळ - स.११ ते ६.३०
पगार - आकर्षक पगार
- संपर्क-
8149699287

जाहिरात छोटी
प्रतिसाद मोठा
आपली मातृभूमि
क्लासिफाईड/
जाहीरनामा
देण्या करीता संपर्क
7028006660

Marriage Was
SONU VINAYAKRAO
UJJAINKAR My New
Name After Marriage Is
SONALI RAHUL GUMBLE
For All Future Purposes
The Person In Both Above
Names Is One and Same
Address - Mahesh Nagar, Sai Nagar Area, Amravati-444607

NAME CHANGE
(Old Name)
Ashalesha
Bhalchandra Sathe
(New Name)
Ashlesha
Bhalchandra Sathe
Address - 8,Vinod
SBI Colony,Camp
Amravati 444602
Old passport
No.-N5679681

WANTED

Name of Society:- Shri Sant Shankar Maharaj Ashram, Pimpalkhuta Tq. Dhamangaon Rly. Dist Amravati

Name of College:- Shri Sant Shankar Maharaj Arts & Commerce College, Pimpalkhuta Tq. Dhamangaon Rly., Dist. Amravati

Applications are invited for the post of Principal-01- Open

QUALIFICATIONS
i. Ph.D. degree;
ii. Professor/Associate Professor with a total service/ experience of at least fifteen years of teaching/research in Universities Colleges and other institutions of higher education;
iii. A minimum of 10 research publications in peer-reviewed or UGC-listed journals, and
iv. A minimum of 110 Research Score as per Appendix II, Table 2 of Direction No 8/2019 on Govt. Resolution dated 8th March, 2019, Direction No. 14/2019 & 17/2019.
Note:- Tenure: A College Principal shall be appointed for a period of five years, extendable for another term of five years on the basis of performance assessment by a Committee appointed by the University, constituted as per Rules

The application may be made on a plain paper/prescribed proforma & addressed to the President/Secretary of the Management on the address given below along with a crossed postal order/DD of Rs. /drawn in the favour of the President/ Secretary of the society concerned / in cash/ by online mode and certified copies of the relevant certificate testimonials towards substantiation of eligibility in terms of academic qualifications, teaching experience, NOC from parent institute and the research score sheet certified by the Principal shall have to be attached

Workload: Workload of 4 hours is mandatory as per the G.R. No. संकीर्ण 2011/(404/11)-विशी-1, dt. 19-10-2011
Pay Scale - As Per UGC & State Government Norms.

SECRETARY/PRESIDENT

NOTE:- Eligible candidates will be called for an interview, apply within 15 days

Saraswati Bahuudeshiya Shikhsan, Sanstha, Badnera Road, Amravati Reg.No MH/639/08F/16066/AMT
Contact No. 8007851484/9823275329

SARASWATI INSTITUTE OF NURSING SCIENCES & RESEARCH, AMRAVATI
(Affiliated to MNC & MUHS Nashik) Organization: Saraswati Bahuuddeshiya Shikshan Sanstha)

ADMISSION NOTICE

MSc NURSING (2 YEAR COURSE) – ACADAMIC YEAR 2026-2027
SPECIALITY WISE SEAT DISTRIBUTION

| Speciality | Constitutional Reservation Category | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN | 15% Inst | Total |
| Medical Surgical Nursing (CVTS) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 03 |
| Mental Health Nursing | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 01 |
| Total | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 2 | 04 |

| SR.NO | SCHEDULE-2 | DATE |
|---|---|---|
| 1 | Last date of submission of application form & specialty-wise preference form | 10/10/2026 |
| 2 | Publication of Provisional Selection List/ Merit List/ Waiting List/Rejected List (Specialty-wise) | 13/10/2026 |
| 3 | Last date of joining | 17/10/2026 |

• IMPORTANT INSTRUCTION & GUIDELINES
1. Contact nos.: +91 80078 51484/+91 98232 75329
2. Selection of candidates will be purely on a merit basis and will strictly adhere to the reservation norms of the Government of Maharashtra, MUHS Nashik, and MNC.
3. Please visit our website for the Application Form, Specialty-wise Preference Form, Merit List, Waiting List, Rejected List, Selection List, and other important information.
4. Incomplete applications or forms received after the due date will not be accepted.
5. All candidates must bring their original documents on the date of admission.
6. Application Will Be Accepted Even on Holiday, in person along with essential documents.
7. Not if any change in Cut off date Extension Schedule will be Display at www.sinsramt.org
8. Subsequent rounds will be conducted as per vacancy position and it will be notified on the institute website and notice board.
9. Please keep checking the website regularly for the latest updates: www.sinsramt.org

HOD, ADMISSION CEL PRINCIPAL

## शेतकऱ्याची आत्महत्या

मोर्शी : लगतच असलेल्या चिखलसावंगी येथील ४२ वर्षीय शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. सचिन उर्फ मोहन अरुण चोपडे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्याकडे चार एकर कोरडवाहू शेती असून त्यांनी आपल्या शेतात तूर, कपाशी, सोयाबीन पेरण्यासाठी बँकेचे व बचत गटाचे कर्ज घेतले होते. मात्र, यावेळी पाऊस कमी प्रमाणात कोसळल्यामुळे कपाशी, सोयाबीन हे हातात येणारे नगदी पीक सुकल्यामुळे पूर्णतः खराब झाले. त्यामुळे आपण कर्ज कसे फेडायचे, या विचारात सचिन नेहमी असायचते. अखेर शेतात जाणाऱ्या रस्त्यावरील कडूलिंबाच्या झाडाला गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली. ■

आपलं अमरावती
www.tarunbharat.net
तरुण भारत
नागपूर, शुक्रवार ९ ऑक्टोबर २०२६ २

## मंत्री डॉ. उदय सामंत आज अमरावतीत

अमरावती : राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय ... शुक्रवारी ९ ऑक्टोबर रोजी अमरावती ... आहेत. मंत्री डॉ. सामंत यांचे शुक्रवारी दुपारी ... वाजता विमानाने अमरावती विमानतळावर ... होईल. त्यानंतर दुपारी ४ वाजता संत ... अमरावती विद्यापीठातील डॉ. के. जी. ... सभागृहात राज्य मराठी विकास संस्था ... विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी अभिमान मराठी' कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ... वाजता मंत्री डॉ. सामंत नागपूरकडे प्रस्थान करतील. ■

### राजेशाही

#### नटसम्राट

नाना पाटेकर म्हणजे
एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व...
शेवटपर्यंत जपलं त्यांनी
स्वतःला पटेल तेच तत्त्व...!
बोलण्याची वेगळी शैली
अभिनयाची निराळी अदा...
वक्तृत्व शैलीवर त्यांच्या
होती लाखो फिदा...!
मराठी रंगभूमीच नव्हे तर
हिंदीतही उमटवला ठसा...
साधी राहणी उच्च विचाराचा
घेतला होता वसा...!
योग्य ठिकाणी स्पष्ट विचार
जिंकून घ्यायचे मन...
तकलादू विचारांवर करायचे
वार दणा दण...!
मानवतेची खरी ओळख
विश्वास साऱ्या दावली...
वर काटे आत गोड गरे
वृत्ती सर्वांना भावली...!
जन्मदात्यांवर बोलायचे भरभरून
काळ्या आईवर निस्सीम प्रेम...
अचुकता होती शब्दा शब्दांत
संघर्षांवर धरला नेम...!
मना मनावर राज करणारे नाना
कायम हृदयात राहतील...
त्यांच्या अस्तित्व खुणा
डोळ्यां मधून वाहतील...!
आपल्यातच असते सदा
असे अजरामर व्यक्तिमत्त्व...
रसिक जपत असतात
त्यांच्या आठवणीचे सत्त्व...!!

वृषाली विजय देवकर
परतवाडा- ९८६०८२३६७७

## गोठ्याला आग

तिवसा : शिरजगाव मोझरी येथे घडलेल्या एका भीषण अग्निकांडात प्रकाश ठवरे आणि पुष्पा बेलसरे या दोन शेतकऱ्यांचे सुमारे दीड लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. वर्ष-दोन वर्षांचा गुरांचा चारा आणि कुटार जपून ठेवणाऱ्या प्रकाश ठवरे यांच्या

# भूजल उपशावर निर्बंध; नवीन विहिरींना बंदी

### दुष्काळाच्या पृष्ठभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

अमरावती, ८ ऑक्टोबर

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी भूजल उपसा व पाण्याच्या वापराबाबत विविध निर्बंध लागू करणारे आदेश जारी केले आहेत. यानुसार जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, ग्रामपंचायत व नगर परिषद क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांना संरक्षित स्रोत म्हणून घोषित करण्यात आले आहे. अधिसूचित सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटर अंतरात नवीन विहीर अथवा बोरवेल खोदण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

शेती, औद्योगिक, व्यावसायिक किंवा खाजगी वापरासाठीही या क्षेत्रात नवीन जलस्रोत निर्माण करता

येणार नसल्याचे आदेशात म्हटले आहे. जिल्ह्यात यंदा पर्जन्यमानात घट नोंदविण्यात आली असून, अनेक भागांत भूजल पातळी चिंताजनक आहे. उन्हाळ्यात ग्रामीण तसेच नागरी भागातील नागरिक आणि पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत हे आदेश काढण्यात आले असून जिल्ह्याच्या संपूर्ण महसुली कार्यक्षेत्रात ३० जून २०२७ पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार आहे.

आदेशानुसार विद्यमान सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताच्या ५०० मीटर परिसरातील विहिरी अथवा बोरवेलमधून होणारा पाण्याचा उपसा नियंत्रित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. ज्या गावांमध्ये पाणीटंचाई जाहीर करण्यात आली आहे किंवा जीडब्लुडीआयनुसार भूजल तुटवडा निर्देशांक जास्त आहे, अशा क्षेत्रात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून १ कि. मी. परिसरातील सर्व विहिरी व बोरवेलमधून भूजल उपशावर निर्बंध राहतील.

जिल्ह्यातील प्रमुख धरणे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प, तलाव, नद्या व जलाशयांमधून शेती सिंचन अथवा व्यावसायिक वापरासाठी अनधिकृतपणे पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. जलसंपदा विभागाने आवश्यकतेनुसार पाणी उपशाची परवानगी द्यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. १६ ऑक्टोबरपासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करण्याचे निर्देश आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

# शेतकऱ्यांचा १२ तास वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी

### खल्लार-गौरखेडा उपकेंद्रावर चर्चा

दर्यापूर, ८ ऑक्टोबर

शेतीला १२ तास वीज मिळावी, या मागणीसाठी खल्लार-गौरखेडा उपकेंद्रावर महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल अरबट यांच्या नेतृत्वात शेतकरी बांधवांनी अभियंता एस. बी. काटोले यांची भेट घेऊन सद्यःस्थिती त्यांच्या लक्षात आणून दिली. कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी आधीच संकटात असून, ज्यांच्याकडे बोर आणि विहिरीची व्यवस्था आहे, त्यांना जर सुरळीत १२ तास वीज मिळाली तर त्यांचे

वीज कार्यालयात आलेले गोपाल अरबट व त्यांचे कार्यकर्ते

येणारे पीक वाचू शकते. या कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या खल्लार, गौरखेडा, सांगवा, बेलोरा, महिमापूर, दिघी, मालवाडा आदी सर्व गावांमधील शेतकऱ्यांना १२ तास सुरळीत वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावर अभियंता काटोले यांनी त्वरित दखल घेऊन सायंकाळी ६ पासनच १२ तास वीजपुरवठा सुरळीत केला जाईल, असे आश्वासन दिले. या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे. ... पोलिसांचा बंदोबस्त ... आला होता. तसेच मोठ्या संख्येने शेतकरी व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

योगेश मोपारी, मनोज ..., सुभाष हरणे, महेंद्र ..., चौधरी, अतुल सगणे, ..., सोपान वडतकर, विनय ..., नागे, शरद आठवले, राहुल ..., वैभव काळे, शुभम ..., साखरे, सागर गेठे, चेतन ..., आकाश नारोळकर, अरविंद ..., महादेव डाहे, सदन हरणे, ..., वैष्णव हरणे, उमेश सोळंके, ... हरणे, कुलदीप सोळंके यांची उपस्थिती होती. ◀(तभा वृत्तसेवा)

## निवडणूक निरीक्षक अभय महाजन नियुक्त

अमरावती : भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून अभय अरविंद महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे. महाजन यांचा निवासाचा पत्ता 'तापी', सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय विश्रामगृह, चपराशीपुरा, अमरावती असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८९९९१०८९१२ असा आहे. ■

# वर्दळीच्या महामार्गावर वाहतूक नियम धाब्यावर

### संबंधित प्रशासन दखल घेणार का?

वरुड, ८ ऑक्टोबर

बसस्थानक ते पांढुर्णा चौक मार्गावरील चौधरी पेट्रोल पंपसमोर ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या अपघातामुळे विद्यार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बसस्थानक ते जार्बट चौक या रस्त्यावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असतानासुद्धा जड वाहनांची वाहतूक नियम धाब्यावर बसवून भरधाव वेगाने सुरू आहे.

नांदगाव पेठ ते पांढुर्णा हा राष्ट्रीय महामार्ग वरुड शहराच्या मध्य भागातून जात असून पांढुर्णा, बैतुल, नागपूर, वर्धा जिल्ह्यात जाणाऱ्या जड व अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यातच या मार्गाला लागून बसस्थानक, पेट्रोल पंप, तहसील कार्यालय, महात्मा फुले कॉलेज, न्यू इंग्लिश हायस्कूल, ऑरेंज सिटी ... झाले असून फक्त त्यातील खिळे शिल्लक राहिले आहे. याकडे पोलिस प्रशासन, सडक परिवहन विभाग, न. प. प्रशासन पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे हा रस्ता नागरिकांसाठी दिवसेंदिवस अडचणीचा ठरत आहे.

वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्याने रस्ता ओलांडताना धोकादायक स्थिती निर्माण होत आहे. सदर स्थिती लक्षात घेता पोलिस प्रशासन, परिवहन विभाग व नगर परिषद प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. दरम्यान, पोलिसांनी मंगळवारी घडलेल्या घटनेतील लक्ष्मी स्टोन क्रेशर कंपनीचा टिप्पर चालक दिनेश नागले याला अटक केली आहे. आरोपीला बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. पुढील तपास ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात विनोद पवार, राम बदने करीत आहे.

टिप्पर मालकाने सामाजिक

# पथ्रोट ग्रामसभेत तरुणांचा गोंधळ

ग्रामसभा अध्यक्षांना माहिती विचारताना नागरिक

### प्रशासकाच्या अध्यक्षतेत ग्रामसभा

शेतकरी प्रमाणपत्र अर्जांबाबत माहिती देणे, बालविवाह मुक्त गाव घोषित करणे, सेवा संकल्प

# अंबादेवी शारदीय नवरात्र ११ ऑक्टोबरपासून

### धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

अमरावती, ८ ऑक्टोबर

विदर्भाची कुलस्वामिनी अमरावती नगरीची ग्रामदेवता अंबादेवीचे शारदीय नवरात्र यंदा रविवार ११ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. यादृष्टीने संस्थानतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार ११ ऑक्टोबरला पहाटे ४.३० वाजता अंबादेवीला सहस्त्रधारा महाभिषेक होईल. त्यानंतर संस्थानचे सचिव रवींद्र कर्वे व त्यांच्या पत्नीच्या हस्ते घटस्थापना होईल. सकाळी ८.३० वाजता

होणाऱ्या प्रवचनमालेचा यंदाचा विषय 'श्री गुरुचरित्र महात्म्य : श्री नृसिंह सरस्वती महाराज यांचे चरित्र' हा राहील. सोमवार १२ ऑक्टोबरला दुपारी १ ते २ या वेळेत तपोवन येथील बंधू भगिनींसाठी दर्शनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून या वेळेत बाकी नागरिक बंधू-भगिनींसाठी ...

असतील. मंगळवार २० ऑक्टोबरला अंबादेवी, एकवीरा देवी यांची दुपारी ४ वाजता सीमोल्लंघन शोभायात्रा निघेल.

नवरात्रात दररोज सर्व भाविकांना मंदिराच्या पूर्वेकडील दारातूनच प्रवेश असेल. पुरुषांना मंदिराच्या पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वारातून तर महिला वर्गासाठी डावीकडील द्वाराकडून प्रवेश असेल. ओटी भरण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिणेकडील द्वारातून भाविक एकवीरा देवीकडे जाऊ शकतील. शैलेश जोग यांच्या नेतृत्वात लोकहित मंच सेवा फाऊंडेशनतर्फे ...

तिवसा : शिरजगाव मोझरी येथे घडलेल्या एका भीषण अग्निकांडात प्रकाश ठवरे आणि पुष्पा बेलसरे या दोन शेतकऱ्यांचे सुमारे दीड लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. वर्ष-दोन वर्षाचा गुरांचा चारा आणि कुटार जपून ठेवणाऱ्या प्रकाश ठवरे यांच्या गुरांच्या गोठ्याला मंगळवारी मध्यरात्री ३ वाजता अचानक भीषण आग लागली. यात शेतातील अवजारे, गुरांचा चारा आणि पुष्पा बेलसरे यांच्या शेतातील स्प्रिंकलरचे ६० पाईप राख झाले. ■

## निधन वार्ता

### वामनराव याऊल

मोर्शी : प्रशांत कॉलनी मोर्शी येथील रहिवासी वामनराव देवराव याऊल यांचे अल्प आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. ते शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत कलाशिक्षक म्हणून कार्यरत राहिले आहेत. ते उत्कृष्ट तबलावादकही होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. ■

आमसभा अध्यक्षांना माहिती विचारताना नागरिक

## प्रशासकाच्या अध्यक्षतेत ग्रामसभा

**पथ्रोट, ८ ऑक्टोबर**

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा बहिष्कार कायम असताना नवनिर्वाचित प्रशासकाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेमध्ये प्रत्येक विषयामध्ये उत्साह व गोंधळ दिसून आला. नेतृत्व दाखविण्याच्या नादात उपस्थितांमध्ये प्रचंड चढाओढ दिसून आली.

८ ऑक्टोबरला पथ्रोट ग्रामपंचायतची ग्रामसभा ११ वाजता ग्रामपंचायतच्या सभागृहात घेण्यात आली. ज्यामध्ये मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवाज प्लस सर्वेक्षण यादीला मंजुरी देणे, सर्वांची योजना सर्वांचा विकास (जीपीडीपी) कृती आराखडा चर्चा करून राबविणे, विकसित भारत रोजगार व आजीवन हमी मिशन ग्रामीण (विविएम रामजी) अंतर्गत विकसित ग्रामपंचायत आराखडा (विविजीपी) तयार करणे, महिला शेतकरी प्रमाणपत्र अर्जांबाबत माहिती देणे, बालविवाह मुक्त गाव घोषित करणे, सेवा संकल्प अभियानाबाबत चर्चा करणे आणि प्लॅस्टिक मुक्त गाव घोषित करणे, अशा प्रकारचे विषय सदर आमसभेत ठेवण्यात आले होते. प्रत्येक विषयावर ईश्वरदास सातंगे यांनी उपस्थित नागरिकांना माहिती दिली. दरम्यान, काही नागरिकांनी प्रश्न उपस्थित करून सदर विषयांबाबत माहिती जाणून घेतली. परंतु, गावातील काही युवकांनी प्रश्न उपस्थित करून प्रचंड चढाओढ व स्पर्धा निर्माण करून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. मद्यप्राशन करून आलेल्या नागरिकांकडून प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला. पण, इतर उपस्थितांनी त्यांचा प्रयत्न हाणून पाडला. सभेचे अध्यक्ष तथा प्रशासक ईश्वरदास सातंगे यांनी कौशल्यपूर्ण दिलेल्या उत्तरांनी मात्र प्रश्न विचारणारे निरुत्तर झाले. यावेळी वरिष्ठ लिपिक राहुल उके, शिक्षक चव्हाण, अंगणवाडी सेविका, माजी ग्रामपंचायत सदस्य, व अन्य उपस्थित होते. ◂ (तभा वृत्तसेवा)

विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार १९ ऑक्टोबरला पहाटे ४.३० वाजता अंबादेवीला सहस्त्रधारा महाभिषेक होईल. त्यानंतर संस्थानचे सचिव रवींद्र कर्वे व त्यांच्या पत्नीच्या हस्ते घटस्थापना होईल. सकाळी ८.३० वाजता सचिव डॉ. जयंत पांढरीकर यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण होईल. ११ ते १९ ऑक्टोबर या काळात पंचेचाळीस वर्षांची अविरत परंपरा लाभलेली प्रवचनमाला संत अच्युत महाराजांचे शिष्योत्तम सचिन देव महाराज सादर करतील.

अंबादेवी कीर्तन सभागृहात रोज सकाळी ८.३० ते १० या वेळेत विषय 'श्री गुरुचरित्र' [illegible] नृसिंह सरस्वती महाराज यांचे [illegible] हा राहील. सोमवार १२ ऑक्टोबरला दुपारी १ ते २ या वेळेत तपोवन येथील बंधू भगिनींसाठी दर्शनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून या वेळेत बाकी नागरिक बंधू-भगिनींसाठी दर्शन व्यवस्था बंद असेल.

सोमवार १९ ऑक्टोबरला दुपारी ११.३० पासून नवचंडी यागाला सुरुवात होऊन पूर्णाहुती सायंकाळी ७ वाजता होईल. गणेश शास्त्री जोशी यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या यज्ञाचे यजमान सचिव डॉ. जयंत व डॉ. सुमेधा पांढरीकर तसेच दीपा व रवींद्र खांडेकर असेल. [illegible] व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिणेकडील द्वारातून भाविक एकवीरा देवीकडे जाऊ शकतील. शैलेश जोग यांच्या नेतृत्वात लोकहित मंच सेवा फाऊंडेशनतर्फे मंदिराच्या पूर्वेस व उत्तरेस विनामूल्य चप्पल स्टॅण्डची व्यवस्था राहील. याशिवाय अंबादेवी संस्थान हॉस्पिटलतर्फे एक आपत्कालीन वैद्यकीय सहायता कक्ष तसेच एक डॉक्टर, प्रथमोपचार वगैरेंची व्यवस्था करण्यात आली असून जोग ट्रस्टच्या सहकार्याने ॲम्ब्युलन्स उपलब्ध असेल. ◂ (तभा वृत्तसेवा)

मोठ्या प्रमाणात [illegible] त्यातच या मार्गाला लागून बसस्थानक, पेट्रोल पंप, तहसील कार्यालय, महात्मा फुले कॉलेज, न्यू इंग्लिश हायस्कूल, ऑरेंज सिटी हायस्कूल, जे. जे. खेरडे हायस्कूल, पावडे हायस्कुल, स्टेट बँक, पशु वैद्यकीय रुग्णालय, ड्रायव्हिंग स्कूल, विविध प्रतिष्ठाने, हॉस्पिटल, हॉटेल्स व दोन मुख्य चौक आहेत. त्यामुळे दिवसभर विद्यार्थी, विद्यार्थिनी, वयोवृद्ध नागरिकांची मोठ्या संख्येने वर्दळ असते. त्यातच या मार्गावर उभारण्यात आलेले गतिरोधकसुद्धा रस्त्यावरून वेगळे ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात विनोद पवार, राम बदने करीत आहे.

टिप्पर मालकाने सामाजिक बांधिलकी जपत मृताच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. या मार्गावर सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत जड वाहनांवर बंदी घालावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार रामदास शेळके यांनी दिली. ◂ (तभा वृत्तसेवा)

## अमरावतीच्या 'बेस्ट बिल्डिंग'चा निर्णय आज

**अमरावती :** गुणवत्तापूर्ण बांधकाम, आकर्षक वास्तुरचना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधणाऱ्या शहरातील उत्कृष्ट प्रकल्पाला बहुमान देणाऱ्या 'बेस्ट बिल्डिंग अवॉर्ड-२०२६' चा फैसला शुक्रवार ९ ऑक्टोबरला होणार आहे. क्रेडाई अमरावतीतर्फे आयोजित या स्पर्धेतील १९ प्रकल्पांची तज्ज्ञ परीक्षकांकडून प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाली असून, शुक्रवारी होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात यंदाच्या विजेत्याच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. त्यामुळे अमरावतीची 'बेस्ट बिल्डिंग' कोणती ठरते, याची उत्सुकता बांधकाम व्यावसायिकांसह शहरवासीयांमध्ये निर्माण झाली आहे. इंजिनीयर्स डेच्या निमित्ताने क्रेडाई अमरावतीकडून दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. यंदा निवासी अपार्टमेंट, रो-हाऊस आणि कमर्शियल प्रकल्पांचा समावेश आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

## वृद्धावर हल्ला करून गुप्तांग कापले

**अचलपूर, ८ ऑक्टोबर**

परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत चिखलदरा स्टॉप ते लॉगिंग युनिट चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर, लॉगिंग युनिट कार्यालयासमोर भरदिवसा एका वृद्धावर अज्ञात युवकांनी केलेल्या अमानुष हल्ल्याने परिसर हादरला आहे. दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेत वृद्धाचे गुप्तांग कापल्याची प्राथमिक माहिती असून, गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, लॉगिंग युनिट कार्यालयासमोर दुपारी ही घटना घडली. अचानक झालेल्या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी वृद्धाला उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला असता तिथे रासेगाव येथील एका व्यक्तीच्या नावाचे आधार कार्ड आढळून आले. हे आधार कार्ड घटनास्थळी कसे आले, त्याचा या घटनेशी नेमका संबंध काय, संबंधित व्यक्तीचा हल्ल्याशी काही संबंध आहे का, यासह अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)


Saraswati Bahuudeshiya Shikhsan, Sanstha Badnera Road, Amravati

Reg. No MH/639/08F/16066/AMT, Contact No. 8007851484/9823275329

**SARASWATI INSTITUTE OF NURSING SCIENCES & RESEARCH, AMRAVATI**

(Affiliated to MNC & MUHS Nashik) Organization: Saraswati Bahuuddeshiya Shikshan Sanstha)

**ADMISSION NOTICE**

M.SC NURSING (2 YEAR COURSE) - ACADAMIC YEAR 2026-2027

SPECIALITY WISE SEAT DISTRIBUTION 2026-27

| Specialty | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN | 15% inst | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Constitutional Reservation Category | | | | | | | | | | | | |
| Medical Surgical Nursing (CVTS) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 03 |
| Mental Health Nursing | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 01 |
| Total | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 2 | 04 |

| SR. NO | SCHEDULE-1 | DATE |
|---|---|---|
| 1 | Last date of submission of application form & specialty-wise preference form | 10/10/2026 |
| 2 | Publication of Provisional Selection List/ Merit List/ Waiting List/Rejected List (Specialty-wise) | 13/10/2026 |
| 3 | Last date of joining | 17/10/2026 |

IMPORTANT INSTRUCTION & GUIDELINES

1. Contact No.: **+91 80078 51484** / +91 98232 75329
2. **Selection of candidates** will be purely on a merit basis and will strictly adhere to the reservation norms of the **Government of Maharashtra, MUHS Nashik, and MNC.**
3. Please visit our website for the **Application Form, Specialty-Wise Preference Form, Merit List, Waiting List, Reject List, Selection List**, and other important information.
4. **Incomplete applications** or forms received after the due date will not be accepted.
5. **All candidates must bring their original documents** on the date of admission.
6. Application will be accepted even on holiday. Applicant should visit the Person.
7. Not if any change in out of date extension schedule will be display at www.sinsramt.org
8. Subsequent rounds will be conducted as per vacancy position and it will be notified on the institution website and notice board.
9. Please keep checking the website regularly for the latest updates. **www.sinsramt.org**

PRINCIPAL

HOD. ADMISSION CEL



**जाहीर नोटीस**

सदस्य महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, नागपूर, खंडपीठ यांचे समोर

REV/TNC/AMR-४४/२०२१

[illegible]

आज दिनांक ०६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

स्थळ-नागपूर, दिनांक - ०६.१०.२०२६

सही/- उपअधीक्षक

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, खंडपीठ, नागपूर


## अमरावती शहरात ५८५ मंडळांचा नवरात्रोत्सव

### ६९ ठिकाणी होणार गरबा

**अमरावती, ८ ऑक्टोबर**

शहरात ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान साजरा होणारा श्री दुर्गादेवी व श्री शारदादेवी नवरात्रोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी अमरावती पोलिस आयुक्तालयाने व्यापक बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. शहरात सुमारे ५८५ सार्वजनिक दुर्गा व शारदादेवी मंडळांची स्थापना होणार असून, ६९ ठिकाणी गरबा नृत्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या पृष्ठभूमीवर मंगळवारी पोलिस आयुक्त कार्यालयात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची आणि उत्सव मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली.

पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, अंबादेवी व एकवीरा देवी संस्थानचे प्रतिनिधी, याशिवाय गरबा आयोजक आणि दुर्गा-शारदा मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही भाग घेतला. मंडळाच्या कार्यकर्त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे तसेच महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी महिला स्वयंसेवक नेमण्यावर भर देण्यात आला. ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन करणे बंधनकारक असून, मिरवणुकांमध्ये ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे व काठ्यांचा वापर, आक्षेपार्ह गाणी आणि आक्षेपार्ह देखाव्यांना मनाई करण्यात आली आहे. सोशल मीडियावर सायबर पोलिसांचे विशेष पथक लक्ष ठेवणार असून, मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही व व्हिडीओग्राफीद्वारे देखरेख केली जाणार आहे.

### पोलिसांचा फौजफाटा तैनात

उत्सवासाठी तीन पोलिस उपायुक्त, चार सहायक पोलिस आयुक्त, २८ पोलिस निरीक्षक, ७० सहायक पोलिस निरीक्षक व पोलिस उपनिरीक्षक आणि १,६५० पोलिस अंमलदारांसह आरसीपी, क्यूआरटी, एक एसआरपीएफ कंपनी तसेच ५०० पुरुष व महिला होमगार्ड तैनात करण्यात येणार आहे. संवेदनशील भागांत फिक्स पॉईंट उभारले जाणार असून, १४ सीआर मोबाईल आणि महिला सुरक्षेसाठी १० दामिनी पथके कार्यरत राहतील. बीट मार्शल व डायल ११२ ची वाहनेही सतत गस्त घालणार आहे. नवरात्रोत्सव, दसरा आणि धम्मचक्र दिन शांततेत व आनंदात साजरे करण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी केले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

## सराईत शेळी चोरास अटक

**अंजनसिंगी :** आष्टा या गावामध्ये तीन संशयित व्यक्ती फिरत असल्याचे गावातील काही लोकांच्या लक्षात आले. त्यांच्यासोबत एक शेळीसुद्धा होती. गावातील काही मंडळींनी त्यांना थांबवून ठेवून घटनेची माहिती मंगरूळ दस्तगीर पोलिसांना फोनवरून दिली. माहिती प्राप्त होताच ठाणेदार संजय आत्राम आणि त्यांच्या टीमने आष्टा गाव गाठत संशयित आरोपींना पोलिस ठाण्यात विचारपूस करण्यास आणले असता त्यातील एक सराईत गुन्हेगार सुजल अमर सारसर, वय १९ वर्ष, राहणार पुलगाव, जि. वर्धा याने शेळी चोर असल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून चोरी गेलेला मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. मंगरूळ दस्तगीर पोलिस स्टेशनला वाठोडा बुद्रुक येथील नीलेश नामदेव मारबदे यांनी शेळी चोरीची तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या शेळी चोरीचीसुद्धा आरोपीने कबुली दिली. ■